**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com


जावक क्र. : व.वि.श.म./ /
दि.१२/०४/२०२६

## मा.आयुक्त महोदयांनी केली शहरातील धोकादायक इमारती व दरड प्रवण क्षेत्राची पाहणी ;

## तसेच मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमाच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा घेत केले मार्गदर्शन

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से) महोदयांनी रविवार दि.१२ एप्रिल २०२६ रोजी शहरातील विविध धोकादायक इमारती तसेच दरड प्रवण क्षेत्रांची प्रत्यक्ष पाहणी केली. सदर पाहणीदरम्यान संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसह परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य धोके लक्षात घेता, जीर्ण व अतिधोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती तातडीची उपाययोजना करण्याच्या सूचना मा.आयुक्त महोदयांनी दिल्या. अशा इमारतींचे सर्वेक्षण करून त्या रिकाम्या करण्याबाबत तसेच रहिवाशांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. यावेळी मा.आयुक्त महोदयांनी प्रभाग समिती बी अंतर्गत सेंट्रल पार्क येथील प्रेरणा बिल्डिंग, प्रभाग समिती डी च्या जुन्या कार्याजवळील कुमार अपार्टमेंट बिल्डींग तसेच सोना अपार्टमेंट बिल्डींग या धोकादायक इमारतींची प्रत्यक्ष पाहणी केली. सदर इमारतींमधील रहिवाश्यांशी मा.आयुक्त महोदयांनी प्रत्यक्ष संवाद साधत सदरील धोकादायक इमारतीत नागरिकांनी रहिवास न करता लवकरात लवकर इतर सुरक्षित ठिकाणी राहावयास जाण्याच्या सूचना दिल्या.

तसेच यावेळी मा.आयुक्त महोदयांनी मोरेगाव डोंगरी, नालासोपारा पूर्व येथील दरड प्रवण क्षेत्राची पाहणी केली. दरड प्रवण भागांमध्ये आवश्यक ती प्रतिबंधात्मक उपाययोजना, जसे की संरक्षण भिंती उभारणे, पाण्याचा निचरा सुरळीत ठेवणे, धोकादायक ठिकाणी इशारा फलक लावणे आदी बाबींवर विशेष भर देण्यात आला. नागरिकांनीही प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सतर्क राहावे, असे आवाहन मा. आयुक्त महोदयांनी केले.

त्याचप्रमाणे भारतीय लोकशाही प्रक्रियेचा कणा मानल्या जाणाऱ्या मतदार याद्या अधिक अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्याच्या दृष्टीने मा.निवडणूक आयोगाच्या वतीने "मतदार याद्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम" (Special Intensive Review - SIR) हाती घेण्यात आला आहे. शासनाच्या निर्देशानुसार मतदार यादींची अचूकता व पारदर्शकता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेअंतर्गत मा.आयुक्त महोदयांनी आज दि.१२ एप्रिल रोजी प्रभाग समिती निहाय कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. तसेच प्रभाग समिती डी अंतर्गत जी.डी.आयडियल स्कूल येथे उपस्थित असलेल्या बीएलओ कर्मचाऱ्यांचा मतदार यादीतील मतदारांच्या मॅपिंगच्या कामकाजाच्या प्रगती संदर्भात आढावा घेतला, तसेच सदर काम अचूकपणे व जलदगतीने करणे संदर्भात योग्य त्या सूचना व मार्गदर्शन केले. नागरिकांनीही मतदार यादी अद्ययावत करण्याच्या दृष्टीने मतदार यादीतील आपल्या नावाचे मॅपिंग करून घेणेसाठी बीएलओ कर्मचाऱ्यांना अचूक माहिती द्यावी व सहकार्य करावे असे आवाहन मा.आयुक्त महोदयांनी केले आहे.

या पाहणीवेळी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत, सहाय्यक आयुक्त श्रीम.अलका खैरे, सहाय्यक आयुक्त श्री.महेश पाटील, संबंधित विभागांचे अभियंते, विभाग प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.